निवडणुकीत झालेल्या सर्व महत्वाच्या घटना
अथवा गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला
ताबडतोब कळविण्याबाबत...

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक-मनपा-२००४/प्र.क्र.३५/का-०५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- १ डिसेंबर, २००४.

**प रि प त्र क**

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, निवडणुकीच्यावेळी होणारे गैरप्रकार किंवा सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविल्या जात नाहीत. यामध्ये खोटे मतदान करणे, जबरदस्तीने मतदान केंद्राचा ताबा घेणे, मतपेटयांत जबरदस्तीने मते टाकणे, गाळलेल्या मतदारांच्या यादीतील लोकांना मतदान करु देणे याचा समावेश होतो. मतमोजणीच्या वेळीदेखील होणा-या सगळया घटना राज्य निवडणूक आयोगास कळविण्यात याव्यात. तसेच निवडणूक प्रक्रिया सुरु असताना घडणा-या सर्व महत्वाच्या घटना राज्य निवडणूक आयोगास कळविणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच गैरप्रकार घडल्यास त्याबाबत पोलिसांकडे तक्रारसुध्दा ताबडतोब नोंदविण्यात यावी.

अशा घटना व निवडणुकीतील गैरप्रकार राज्य निवडणूक आयोगाला कळवून त्यावर राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन मागविणे ही संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांची जबाबदारी असेल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिका-यांना दयावी. असे न घडल्यास निवडणूक निर्णय अधिकारी तथा अन्य कर्मचारी यांच्याविरुध्द कारवाई होईल, याची कल्पना सर्व निवडणूक निर्णय अधिकारी व अन्य निवडणूक कर्मचारी यांना दयावी.

( नंद लाल )
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति,
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व महानगरपालिका आयुक्त
३) सर्व जिल्हाधिकारी
४) सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी